*स्वरगंध निर्मित*

# 'सदाबहार गीते'

**लोकप्रिय मराठी व हिंदी गीतांचा कार्यक्रम**

गायक :

संजीव साने, अश्विनी वझे, शुभांगी मुळे व सुधाकर करमरकर

स्थळ :

**स्नेहसदन हॉल**

शनिवार पेठ, पुणे ३०.

दि. २०-१०-२००७,

सायं. ५॥ वा.

संपर्क : ६४००२२९७

# गदिमांच्या गाण्यांनी मने जिंकली!

पुणे, ता. २० : 'विठ्ठला तू वेडा कुंभार', 'एक वार पंखावरूनी फिरो तुझा हात', 'का रे दुरावा, का रे अबोला', आदी गाण्यांनी 'गदिमा गाणी- गप्पा आणि आठवणी' या कार्यक्रमात उपस्थितांची मने जिंकली.

रंगत- संगत प्रतिष्ठानतर्फे ग. दि. माडगूळकर यांच्या गीतावर आधारित 'गदिमा गाणी-गप्पा आठवणी' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. गायिका शुभांगी मुळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी गाणी सादर केली.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात 'गीतरामायण' सादर करण्यात आले. श्रीधर माडगूळकर यांनी 'गदिमां'च्या आठवणींना उजाळा दिला. त्यांनी 'गदिमां'च्या जन्माची कहाणी, साहित्य, चित्रपट, संगीत आदीबाबत आढावा घेतला. प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. प्रमोद आडकर यांनी प्रास्ताविक केले.



# आठवणी 'गदिमां'च्या

ज्येष्ठ कवी ग. दि. माडगूळकर यांच्या गीतांवर आधारित 'आठवणी... गदिमा'च्या हा कार्यक्रम रंगत संगत प्रतिष्ठान तर्फे २० एप्रिल रोजी सायंकाळी साडेपाच वाजता नवी पेठेतील पत्रकार भवनात आयोजित करण्यात आला आहे. श्रीधर माडगूळकर आणि लीनता आंबेकर यांच्यासह शुभांगी मुळे व सहकारी हे हा कार्यक्रम सादर करणार आहेत.